# हत्तीरोगग्रस्ताची ३० किलोच्या मेदापासून मुक्तता

प्रतिनिधी
मुंबई

त्या महिलेचे वय साठ वर्षे असून पायाला हत्तीरोग झाल्याचे डॉक्टरांकडून निष्पन्न झाले. त्यांच्या शरिराच्या वजनाएवढे मेद पायात साचल्याने हलता देखील येत नव्हते. कुशीवर वळताना असह्य त्रास होत असे. मात्र, या पायावर शस्त्रक्रिया करून हत्तीरोगामुळे साचलेले ३० किलो मेद काढण्यात नानावटी रुग्णालयातील सर्जन डॉ. मनमोहन कामत यांना यश आले.

हत्तीरोग संसर्गामध्ये पायात एवढे अधिक मेद साचण्याची ही दुर्मीळ घटना असल्याचे डॉक्टर सांगतात. पायाला हत्तीरोग होणे ही सर्वसाधारण घटना आहे. मात्र, या ज्येष्ठ महिलेचा हत्तीरोग विकार उपचारांच्या आवाक्याबाहेर गेला असल्याचे प्रथम दर्शनी दिसत होते. हत्तीरोगग्रस्त महिलेच्या पायाचे छायाचित्र घेऊन तिचा मुलगा डॉ. मनमोहन कामत यांच्याकडे आला.




**नानावटी रुग्णालयात दुर्मीळ शस्त्रक्रिया**

रुग्ण दवाखान्यापर्यंत चालत येऊ शकत नसल्याचे त्याने डॉक्टरांना सांगितले. त्यावेळी डॉ. कामत यांनी आईला आणण्यास सांगितले.

या महिलेच्या पायावर सूज येण्याची हत्तीरोगाची लक्षणे गेल्या पाच ते सहा वर्षापासून दिसत होती. मात्र, त्यावेळी रुग्णाच्या पायाचे नीट निदान झाले नव्हते. त्यामुळे ही गंभीर स्थिती उद्‌भवली होती. रुग्णाचा पाय पाहून विकार हत्तीरोगाच्या पुढील पायरीच्या लक्षणांमध्ये मोडत असल्याचे स्पष्ट दिसत होते. त्यामुळे डॉक्टर कामत यांनी ताबडतोब शस्त्रक्रियेचा सल्ला त्यांना दिला. रुग्णाच्या कुटुंबियांनी देखील निर्णय घेऊन शस्त्रक्रियेसाठी संमती दर्शवल्याने शस्त्रक्रिया दोन टप्प्यात करावी लागली. शस्त्रक्रियेनंतर त्या वॉकरच्या सहाय्याने चालत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

याबाबत डॉ. कामत यांनी सांगितले की, पायाला हत्तीरोग होणे सर्वसाधारण असून ही केस वजन वाढत गेल्याने गंभीर झाली होती. काहीवेळा अशा पायांना जखमा होऊन पाय काढून टाकावा लागतो. फायलेरीया या जंतूपासून होणारा हा रोग डासाच्या चावण्याने शरिरात प्रवेश करत असतो. औषधोपचाराच्या पलिकडे गेल्याने शस्त्रक्रियेचा विचार करून ताबडतोब त्या महिलेला पायावर उभे करण्याचा निर्णय घेतल्याचे डॉ. कामत यांनी सांगितले.